Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

# कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणूक यातील सहसंबंधाचा अभ्यास

***डॉ. हेमंतकुमार यशवंत देवरे***

***आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर, जि. धुळे.***

**सारांश:** प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यातील सहसंबंधाचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला असून २५० (कला ८०, विज्ञान १००, वाणिज्य ७०) विद्यार्थ्यांची सहेतुक नमुना निवड पद्धतीने न्यादर्शाची निवड केली होती. विद्यार्थ्यांची अभ्यास सवयी मापन करण्यासाठी डॉ. टी. प्रदीपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिकेचा (Study Habits Scale (SHS)) अवलंब केला होता. तसेच शैक्षणिक संपादणूक ही विद्यार्थ्यांची प्रथम सत्रांत परीक्षेत मिळालेल्या गुणाकांचा विचार केला होत. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसनच्या सहसंबंध गुणक (r) या संख्याशास्त्रीय परिमणाचा अवलंब केला होता. निष्कर्षः कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात धन व चांगला सहसंबंध आढळून येतो.

**प्रस्तावना:** शैक्षणिक विकास घडवून येण्यासाठी पालक आणि शिक्षक आपआपल्या स्तरावर विविध प्रयत्न करीत असतात. त्याचबरोबर विद्यार्थी ही चांगल्या प्रकारे अध्ययन व्हावे आणि आपल्याला आपल्या परीक्षेत चांगले गुण प्राप्त व्हावे यासाठी विविध प्रयत्न करीत असतात. अध्ययनासंदर्भात वातावरण, शिक्षकांचे अध्यापन, कौटूंबिक वातावरण, स्मरण शक्ती याच बरोबर अभ्यास सवयींचाही विचार केला जातो. उत्तम अभ्यास सवयी असल्यास विद्यार्थी स्मरण चांगले करतो. परीक्षेत त्याचे उपयोजनही होते आणि अध्ययन हे आयुष्यभर समरणातही राहते त्यामुळे अभ्यास सवयी या सदोष असल्या पाहिजे. अभ्यासाच्या सवयीचा दोष दुर्लक्ष करण्यासारखा नाही हे मान्य करावे लागेल या प्रमाणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अपेक्षेहून वेगळे प्रश्न आल्यास त्या प्रश्नांची उत्तरे सोडविणे कठीण होवून जाते एवढेच नाही तर त्या प्रश्नाची भाषा बदलल्यामुळेही त्यांचा गोंधळ होतो कारण त्यांना विषयज्ञानाचे पुरेसे आकलन झालेले नसते काही वेळेस प्रश्नावलीची क्रमसंख्या भाषा बदल्यामुळे ही विद्यार्थी गोंधळून जातात येथे विद्यार्थ्यांचा अभ्यास सवयी दोषी

ठरतात हे स्पष्टपणे जाणवते.

केवळ बरेच लोक म्हणतात तुम्ही आठ-आठ तास जरी विद्यार्थ्याने अभ्यास केला तर त्याचा अपेक्षित परिणाम विद्यार्थ्याला मिळत नाही. कारण त्यात त्यांची स्वत:ची इच्छा शक्ती मिळालेली नसते. चांगल्या अभ्यास सवयी या चांगल्या शैक्षणिक संपादणूकीचे लक्षण असतात. त्यामुळे अभ्यास सवयींकडे योग्य लक्ष देणे हा अतिशय महत्त्वाचा आणि विचारांचा विषय आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक संपादणूकीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास केला आहे.

**समस्याविधान:**

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणूक यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूकीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूकीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.
३. कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूकीशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.
३. कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

**पद्धती-** प्रस्तुत संशोधनात संशोधकाला शिरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणूक यातील सहसंबंधाचा सद्यस्थितीचा

अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. **जनसंख्या व न्यादर्श -** शिरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेत (१२ वी) प्रवेशित विद्यार्थ्यांची जनसंख्या निश्चित केली होती. न्यादर्श म्हणून २५० (कला ८०, विज्ञान १००, वाणिज्य ७०) विद्यार्थ्यांची सहेतुक नमुना निवड पद्धतीने न्यादर्शाची निवड केली होती. **संशोधनाची साधने-** कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा अभ्याससवयीचा अभ्यास करण्यासाठी डॉ. टी. प्रदीपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिकेचा (Study Habits Scale (SHS)) अवलंब केला होता. प्रस्तुत मापिकेत एकूण ३० विधाने होते. २४ होकारात्मक व ०६ नकारात्मक विधाने होती. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक ही इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली होती त्यातील गुणांचा विचार करण्यात आला होता. **संख्याशास्त्रीय परिमाणे -** संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसनच्या सहसंबंध गुणक (r) या संख्याशास्त्रीय परिमणाचा अवलंब केला होता.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन -** प्रस्तुत संशोधनात कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना अभ्यास सवयी मापिका देण्यात आली होती त्यांच्या या मापिकेला दिलेला प्रतिसादाचे विश्लेषण करून त्यांना प्राप्त गुणांक व प्रथम सत्रांत परीक्षेत मिळालेले गुणांक यांच्यातील सहसंबंध काढून पुढील प्रमाणे परिकल्पनांचे विश्लेषण केलेले आहे.

**परिकल्पना परीक्षण**

१. **कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| कला शाखा | अभ्यास सवयी |
|---|---|
| | शैक्षणिक संपादणुक |
| संख्या (N) | ८० |
| df (स्वाधीनता मात्रा) | ७८ |
| नमुना 'r' मूल्य | .१९५ |
| प्राप्त 'r' मूल्य | **.७६८** |
| त्याग /स्वीकार | त्याग |
| सहसंबंध | चांगला व उत्तम |

df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 'r' मूल्य .१९५ आहे व प्राप्त 'r' मूल्य .७६८ असून ते नमुना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणुक यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरून असे म्हणता येईल की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांची अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणुक यांच्यात धनसहसंबंध असून तो चांगला व उत्तम सहसंबंध आहे.

**२. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| विज्ञान शाखा | अभ्यास सवयी |
|---|---|
| | शैक्षणिक संपादणुक |
| संख्या (N) | १०० |
| df (स्वाधीनता मात्रा) | ९८ |
| नमुना 'r' मूल्य | .१९५ |
| प्राप्त 'r' मूल्य | **.६९९** |
| त्याग /स्वीकार | त्याग |
| सहसंबंध | चांगला |

df = ९८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 'r' मूल्य .१९५ आहे व प्राप्त 'r' मूल्य .६९९ असून ते नमुना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणुक यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरून असे म्हणता येईल की, कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणुक यांच्यात धनसहसंबंध असून तो चांगला सहसंबंध आहे.

**३. कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

| वाणिज्य शाखा | अभ्यास सवयी |
|---|---|
| | शैक्षणिक संपादणुक |
| संख्या (N) | ७० |
| df (स्वाधीनता मात्रा) | ६८ |
| नमुना 'r' मूल्य | .१९५ |
| प्राप्त 'r' मूल्य | **.६३९** |
| त्याग /स्वीकार | त्याग |
| सहसंबंध | चांगला |

df = ६८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 'r' मूल्य .१९५ आहे व प्राप्त 'r' मूल्य .६३९ असून ते नमुना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणुक यात सार्थ सहसंबंध आढळून येतो. यावरून असे म्हणता येईल की, कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची अभ्यास सवयी व शैक्षणिक संपादणुक यांच्यात धनसहसंबंध असून तो चांगला सहसंबंध आहे.

**निष्कर्ष**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी व शैक्षणिक संपादणूक यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

**चर्चा -** वरिल निष्कर्षावरून लक्षात येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी या अनुकूल आहेत. तसेच त्यांचा शैक्षणिक संपादणूकीशी असलेला सहसंबंध आहे धन व चांगला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संपादणूकीत प्रगती नेहमीच दिसून येत असेल. पालकांनी विद्यार्थी घरी असेल तर त्यांच्या अभ्यासाचे नियोजन करावे, त्यांच्यासाठी खेळण्यासाठी वेळ द्यावा, घरातील वातावरण उल्हासीत व प्रेरणा देणारे असावे. शाळेत शिक्षकांनी उल्हासीत व आनंदीत वातावरण राखले पाहिजे, विद्यार्थी अभ्यासकडे वळतील असा स्वाध्याय दिला पाहिजे ज्यामुळे विद्यार्थी आभ्यासकडे वळतीलच व त्यांच्या शैक्षणिक संपादणकीतही प्रगती होवू शकते.

## संदर्भसूची

Chauhan, S.S. (1999). Advanced Educational Psychology, Vikas Publishing House, New Delhi.

Garrett, H. E (1985) Statistics in Psychology and Education, Bombay Vakils, Feiffer and Simons Ltd.

Aggarwal J.C. (1991). Educational & Vocational Guidance & Counselling. New Delhi: Doaba House.

पंडित, ब. बि. आणि मोरे, लता. (२०१०). शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग. नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स

डॉ घोरपडे आणि घोरपडे, कला (२०१०) शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, नागपूर: विद्या प्रकाशन.

दुनाखे, अरविंद (२००९) शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

जोशी बी. आर. (२००७) सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिध्दांताचा कोश (मानसशास्त्र) पुणे: डायमंड पब्लिकेशन्स प्रथम आवृत्ती २००७.

जगताप, ह.ना. (आवृत्ती ०३), (२००७). शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे: नरेंद्र प्रकाशन.

गुळवणी, मेघा (२००९). मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

करंदीकर, सुरेश. (२००९). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.